लोकमत

## 'बार्टी'चा पुढाकार : प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षण केंद्र

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** बँक, रेल्वे, एलआयसीसह विविध स्पर्धा परीक्षामध्ये मागासवर्गीय विद्यार्थी यशस्वी व्हावेत, यासाठी त्यांना चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याबाबत बार्टी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था)ने पुढाकार घेत मान्यताप्राप्त संस्थांशी करार केला आहे. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात येणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे ही सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेली एक स्वायत्त संस्था आहे. प्रशिक्षण देणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. या अंतर्गत प्रशिक्षणाच्या अनेक योजना व अभियान सुरु आहेत.

> बार्टीने घेतलेल्या या पुढाकारामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा मोठा फायदा होणार आहे. अनेक गुणवंत मुलं स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. बहुतांश मुलं फार थोड्या गुणांनी मागे राहतात. आता दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध झाल्यास स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याचे प्रमाण वाढेल.
>
> **- पंकज माने,** प्रकल्प संचालक, बार्टी नागपूर

मागासवर्गीय विद्यार्थी हे स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असतात. स्पर्धा परीक्षेची तयारी करुन देण्याठी अनेक खासगी संस्थाही आहेत. परंतु त्यांचा खर्च मागासवर्गीय विद्यार्थ्यांना परवडण्यासारखा नाही. अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी करुन देण्यासाठी बार्टीने पुढाकार घेतला आहे. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात १०० विद्यार्थी (मुलं-मुली) क्षमतेची एक बॅच सुरु केली जाणार आहे. विदर्भात नागपूर, चंद्रपूर आणि भंडारा येथे अशा बॅच सुरु झाल्या आहेत. नागपुरात दोन बॅच आहेत. यासाठी मान्यतापाप्त प्रशिक्षण संस्थांशी करार करण्यात आला आहे. त्यांचे प्रशिक्षक हे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.